ePaper


## तमिळनाडूच्या राजकारणात भूकंप! के. अन्नामलाई भाजपा सोडणार?



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 02 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

हिंजवडीत ७०० आयटी कर्मचाऱ्यांना झटका

## ममतांनी बोलावलेल्या बैठकीला ८० पैकी ६१ आमदारांची दांडी..

# ममतांच्या टीएमसीमध्ये गोंधळात गोंधळ..!

**महाईन्यूज । कोलकाता**

**तृणमूल काँग्रेसने आपल्या सर्व आमदारांची रविवारी बैठक बोलवली होती. या बैठकीचे अध्यक्षपद खुद्द ममता बॅनर्जी भूषवणार होत्या. ही बैठक कोलकाता येथील ममता बॅनर्जी यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आली होती. मात्र या बैठकीला निवडून आलेल्या ८० पैकी फक्त १९ आमदारांनीच हजेरी लावली.**

चटोपाध्याय यांना विरोधी पक्षनेता म्हणून नोमिनेट केलेल्या पत्रातील काही स्वाक्षऱ्या खोट्या असल्याची सीआयडी चौकशी करण्यात येत आहे. त्याबाबत चर्चा करण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. विरोधीपक्ष नेता म्हणून नियुक्त करण्यासाठी ८० पैकी किमान ३० आमदारांची पत्रावर स्वाक्षरी गरजेची असते.

दरम्यान, तृणमूल काँग्रेसचे अनेक आमदार भाजपच्या संपर्कात असून तृणमूल काँग्रेस उभ्या फुटीच्या उंबरठ्यावर असल्याचा दावा देखील करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर ८० पैकी तब्बल ६१ आमदारांची ममतांनी बोलवलेल्या बैठकीला दांडी मारण्याने बंगालमध्ये राजकारण वेगळ्या वळणावर चाललं आहे का अशी शक्यता वर्तवली जात आहे.




## बैठक पुढे ढकलण्याची केली होती विनंती...

घोष म्हणाले, 'अनेक आमदारांनी नेतृत्वाला काल फोन करून ते आंदोलन करत आहेत त्यामुळं ते या बैठकीला येऊ शकणार नाहीत असं कळवलं होतं त्यांनी बैठक पुढे ढकलावी अशी मागणी देखील केली होती. काही लोकांनी आज देखील फोन केले आहेत. जे कोणी या बैठकीला आले त्यांच्यासोबत आम्ही थोडी चर्चा केली. त्यानंतर आता पुढची बैठक कधी होणार हे लवकरच जाहीर करण्यात येईल.'

## आंदोलन की वेगळंच कारण

याबाबत प्रतिक्रिया देताना तृणमूल काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी आणि कोलकातामधील बेलियाघाटा येथील आमदार कुणाल घोष यांनी सांगितलं की, या बैठकीला बहुतांश आमदार येऊ शकले नाहीत कारण ते अभिषेक बॅनर्जी यांच्यावरील हल्ल्याचा निषेध करण्यासाठी रस्त्यावर आंदोलन करण्यासाठी उतरले होते.

## ममताही करणार आंदोलन

घोष यांनी, 'आम्ही शनिवारी अभिषेक बॅनर्जी आणि रविवारी खासदार कल्याण बॅनर्जी यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधात उप विभागीय आणि कम्युनिटी ब्लॉक स्तरावर उद्या आंदोलन करणार आहेत. २ जून रोजी ममता बॅनर्जी देखील राणी रासमोनी रोडवर एका दिवसाचे आंदोलन करणार आहेत.' असे सांगितलं.



# सुप्रिया सुळेंच्या टीकेनंतर पोलीस आयुक्तांचे पत्र

## खासदार सुळे यांना पाठविलेल्या पत्रात पुण्यातील गुन्हेगारीत घटल्याचा दावा

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील भरदिवसा गोळीबार, कोयते उगारून दहशत माजविण्याच्या घटना वाढीस लागल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी पुण्यातील कायदा-सुव्यवस्थेवर चिंता व्यक्त करुन पोलिसांच्या कार्यक्षमतेवर टीका केली. पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या कार्यपद्धतीवर टीका करुन त्यांनी पोलीस आयुक्तांना थेट सक्तीच्या रजेवर पाठविण्याची मागणी केली होती. सुळे यांच्या टीकेनंतर पोलीस आयुक्तांनी सुळे यांना पुणे पोलिसांनी केलेल्या कामगिरीचा आढावा घेणारे पत्र पाठविले आहे. या पत्रात पुण्यातील गुन्हेगारीत घट झाल्याचा दावा पोलीस आयुक्तांनी केला आहे.**





पुणे-सातारा रस्त्यावर पंधरा दिवसांपूर्वी भरदिवसा टोळीयुद्धातून तरुणावर गोळीबार करुन कोयत्याने वार करण्यात आले होते. शहरात कोयेते उगारून दहशत माजविण्याच्या घटना, तसेच वाहनांची तोडफोड अशा प्रकारच्या घटनांमुळे पुणेकरांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पुणे पोलिसांच्या कार्यक्षमेतवर नाराजी सुळे यांनी व्यक्त केली होती. सुळे यांनी गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर काही प्रश्न उपस्थित करुन पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली होती. विषारी दारू प्रकरणानंतर सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन पोलीस आयुक्तांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याची मागणी केली होती. राष्ट्रीय गुन्हे सांख्यिकी संस्था (एनसीआरबी) गुन्हेगारीत पुण्याचा क्रमांक पाचव्या स्थानावर आहे, अशी टीका केली होती.

सुळे यांच्या टीकेनंतर पोलीस आयुक्तांनी सुळे यांना पत्र पाठविले आहे. गेल्या दोन वर्षातील गुन्हेगारी घटना, गंभीर गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण याबाबतची माहिती सुळे यांना पत्राद्वारे दिली. या पत्रात पोलीस आयुक्तांनी पुण्यातील गुन्हेगारी कमी झाल्याचा दावा केला आहे.' २०२५ च्या तुलनेत २०२६ मध्ये बहुतांश गंभीर गुन्ह्यांच्या घट झाली आहे. खुनाचा प्रयत्न, लूटमार, दागिने हिसकावणे, घरफोडी, वाहन चोरी, गंभीर दुखापत, बलात्कार, विनयभंग अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये गेल्या चार महिन्यात घट झाली आहे.

मात्र, शहराता गेल्या दहा ते पंधरा दिवसांत गंभीर गुन्ह्यांच्या घटना वाढल्या. त्यानंतर पोलिसांनी शहरात सरइतांची झाडाझडती (कोम्बिंग ऑपरेशन) घेतली. शहरातील वेगवेगळ्या भागात गस्त वाढविली. प्रतिबंधात्मक कारवाया करुन सराइतांना ताब्यात घेतले', असे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सुळे यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

'शहरात टोळीयुद्धातून गोळीबार झाला. पोलिसांनी त्वरीत या घटनेत गंभीर जखमी झालेल्या तरुणाला रुग्णालयात दाखल केले. पोलिसांच्या प्रयत्नांमुळे तरुणाचे प्राण वाचले. पोलिसांनी रात्रगस्त वाढवली आहे. जीपीएस तंत्रज्ञानाचा वापर करुन शहरातील घटनांवर लक्ष ठेवण्यात येत आहे. चौकाचौकात पोलीस बंदोबस्तास नेमण्यात आले आहेत. पोलिसांच्या उपस्थितीमुळे गुन्हेगारी नियंत्रणात येईल', असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

### पोलीस आयुक्तांचा दावा

'गेल्या पाच महिन्यात खुनाचा प्रयत्न प्रकरणातील गुन्ह्यांमध्ये २७ टक्क्यांनी घट झाली आहे. सोनसाखळी चोरीत ५६ टक्के, तसेच लूटमारीच्या घटनांमध्ये ३६ टक्के घट झाली आहे. वाहन तोडफोडीच्या घटनांमध्ये ५० टक्के घट झाली आहे. मे महिन्यात पाच गंभीर गुन्हे घडले. त्यानंतर शहरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली, तसेच पोलिसांची गस्त वाढविण्यात आली', असा दावा पोलीस आयुक्तांनी पत्राद्वारे केला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात उमेदवारीवरून गोंधळ कायम!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील विधान परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात उमेदवारीबाबत गोंधळ कायम राहिला आहे. या पक्षाने उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपचे माजी खासदार संजय काकडे यांचे चिरंजीव विक्रम काकडे यांना पक्षात प्रवेश देऊन उमेदवारी दिल्यानंतर माजी आमदार, शहराध्यक्ष सुनिल टिंगरे यांनीही अर्ज दाखल केला आहे. दोघांनाही पक्षाने 'एबी फॉर्म' दिला आहे. चार जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असून, त्यानंतरच नक्की उमेदवार कोण, हे स्पष्ट होणार आहे.**



या मतदार संघावरून सुरुवातीला भाजप आणि 'राष्ट्रवादी' यांच्यात उमेदवारीवरून वाद झाला. ही जागा 'राष्ट्रवादी'ची असली, तरी भाजपने या जागेवर दावा केला होता. महायुतीच्या जागा वाटपात ही जागा 'राष्ट्रवादी' ला मिळाली आहे. आता उमेदवारीवरून गोंधळ निर्माण झाला आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची सोमवारी अंतिम मुदत असताना उमेदवारीबाबत शेवटच्या क्षणापर्यंत चुरस कायम राहिली. भाजपचे माजी खासदार संजय काकडे आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यात रविवारी रात्री उशीरापर्यंत चर्चा झाली. त्यानंतर खासदार काकडे आणि त्यांचे पुत्र विक्रम काकडे या दोघांनी सोमवारी 'राष्ट्रवादी'त प्रवेश केला. पक्षप्रवेश झाल्यानंतर विक्रम काकडे यांना उमेदवारी देण्याचे निश्चित करण्यात आले. काकडे यांना उमेदवारी देण्याचे निश्चित झाल्यानंतर 'राष्ट्रवादी'मध्ये नाराजी पसरली. माजी आमदार आणि शहराध्यक्ष सुनिल टिंगरे यांनीही उमेदवारीसाठी आग्रह धरला. त्यामुळे दोघांनाही पक्षाने 'एबी फॉर्म' दिले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी चार जून रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत मुदत आहे. त्यावेळी कोणाला उमेदवारी मागे घेण्याचा आदेश पक्षाकडून दिला जाणार, याबाबत उत्सुकता असणार आहे.

### श्रीकांत पाटील शरद पवार गटाचे उमेदवार


पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषदेच्या जागेसाठी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष, माजी नगरसेवक श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या आदेशानुसार श्रीकांत पाटील यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या रणनीतीकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

# हिंजवडीत ७०० आयटी कर्मचाऱ्यांना झटका

## पगार आणि रोजगार बुडाला; संतप्त कर्मचाऱ्यांची पोलिस व कामगार विभागाकडे धाव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हातात नोकरीचे नियुक्तीपत्र आणि डोळ्यांत उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने घेऊन हिंजवडीत दाखल झालेल्या सातशेहून अधिक तरुण-तरुणींना एका रात्रीत बेरोजगार केले आहे. थिंक टेक्नॉलॉजी इंडिया या आयटी कंपनीने अचानक टाळेबंदी करत कर्मचाऱ्यांचे पगार, इंटर्न्सची डिपॉझिट रक्कम आणि भविष्यच अंधारात ढकलल्याने संतप्त कर्मचाऱ्यांनी पोलिस व कामगार विभागाकडे धाव घेतली आहे.**




हिंजवडी फेज-२ मधील गेराज इम्पेरियम राईज इमारतीतून ही कंपनी कार्यरत होती. गेल्या काही महिन्यांत कंपनीने मोठ्या प्रमाणावर नोकरभरती केली होती. सुरुवातीला इंटर्न्सना वेळेवर १५ हजार रुपये मानधन देऊन विश्वास संपादन करण्यात आला. मात्र, फेब्रुवारीपासून कर्मचाऱ्यांचे पगार रखडू लागले. याबाबत विचारणा केल्यावर कंपनीचे संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी हर्षल ठाकरे आणि एचआर विभागाने इंटरनल ऑडिट सुरू असल्याचे कारण देत दि. २५ ते दि. २८ फेब्रुवारीदरम्यान सर्व थकीत रक्कम अदा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर कर्मचाऱ्यांचा दबाव वाढल्यानंतर व्यवस्थापनाने पगाराचे धनादेश दिले. मात्र, हे सर्व धनादेश वटले नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला.

तसेच कंपनीने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक टाळेबंदी केली. त्यामुळे एका रात्रीत सातशेहून अधिक सॉफ्टवेअर इंजिनिअर्स, फ्रेशर्स आणि इंटर्न्स बेरोजगार झाले. आता त्यांच्या भवितव्याबाबत चिंता निर्माण झाली असून, रखडलेल्या पगारामुळे घरखर्च, घरभाडे आणि कर्जाचे हप्ते भरण्याचे मोठे संकट त्यांच्यासमोर उभे ठाकले आहे. यातील बहुतांश कमर्चारी हे पुण्याबाहेरील आहेत.

> थिंक टेक्नॉलॉजी इंडिया प्रकरणात सातशेहून अधिक कर्मचारी आर्थिक संकटात सापडले आहेत. फ्रेशर्सकडून लॅपटॉप व नोकरीच्या नावाखाली पैसे घेऊनही पगार आणि ठेव रक्कम न दिल्याचे आरोप होत आहेत. आयटी क्षेत्रातील अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कामगार विभागाने विशेष तपासणी मोहीम राबवावी. दोषी आढळणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करून कर्मचाऱ्यांचे हित जपणे आवश्यक आहे.
>
> **- प्रशांत पंडित, सरचिटणीस, फोरम ऑफ आयटी एम्प्लॉईज.**

> थिंक टेक्नॉलॉजी कंपनीच्या एचआर विभागाने मला १५ हजार रुपयांचा धनादेश दिला. तो बँकेत जमा केला असता वटला नाही. कंपनीचा मालक गायब झाला असून याबाबत माहिती असतानाही एचआर विभागातील अधिकारी मूग गिळून गप्प बसले. माझे चार महिन्यांचे नुकसान झाले. पोलिसांत तक्रार केली. तथापि काहीच कारवाई होत नाही.
>
> **- एक आयटी कर्मचारी, हिंजवडी.**

# खाकीसमोर नियम हतबल? झेब्रा क्रॉसिंगवर पोलिसांची वाहने, विनाहेल्मेट प्रवास

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करणारे आणि नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करणारे पोलीसच नियम मोडत असल्याचे प्रकार पिंपरी-चिंचवड शहरात वारंवार समोर येत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसाठी एक नियम आणि पोलिसांसाठी दुसरा, अशी भावना नागरिकांमध्ये बळावत आहे.**





शहरातील विविध ठिकाणी वाहतूक विभागाची टोईंग व्हॅन झेब्रा क्रॉसिंगवर उभी राहत असल्याचे दिसून येत आहे. पादचाऱ्यांसाठी राखीव असलेल्या जागेवरच पोलिसांची वाहने उभी राहत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करणारी यंत्रणाच नियमांचे उल्लंघन करत असल्याने वाहतूक शिस्तीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.




याशिवाय, एका महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या खासगी वाहनावरील तुटलेली नंबर प्लेट आणि त्यावरील 'पोलीस' पाटीही चर्चेचा विषय ठरली आहे. सर्वसामान्य नागरिकाच्या वाहनावर अशी त्रुटी आढळल्यास तत्काळ दंड आकारला जातो. मात्र, पोलिसांच्या बाबतीत नियमांची अंमलबजावणी होत नसल्याची टीका होत आहे.

हेल्मेट सक्तीबाबत जनजागृती करणारे काही पोलीस कर्मचारी स्वतःच विनाहेल्मेट दुचाकी चालवत असल्याचे प्रकारही अनेकदा समोर आले आहेत. 'नो हेल्मेट, नो एन्ट्री'चे फलक लावणाऱ्या यंत्रणेलाच स्वतःच्या आदेशांचा विसर पडल्याचे चित्र दिसत आहे.

दरम्यान, नियमभंग करणाऱ्या पोलिसांवर आतापर्यंत किती कारवाई करण्यात आली, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे कायद्याचा बडगा फक्त सर्वसामान्यांसाठीच का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून या प्रकारांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कठोर भूमिका घेण्याची मागणी होत आहे.

### खाकीसमोर नियम हतबल?

वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करणारे पोलीसच नियमभंग करत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. झेब्रा क्रॉसिंगवर उभी राहणारी टोईंग व्हॅन, तुटलेल्या नंबर प्लेटची वाहने आणि विनाहेल्मेट प्रवासामुळे दुहेरी निकषांचा प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांवर कठोर कारवाई करणाऱ्या यंत्रणेने स्वतःच्या कर्मचाऱ्यांवरही समान नियम लागू करावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

### नियम जनतेसाठी, सवलत खाकीसाठी?

वाहतूक शिस्त राखण्यासाठी नागरिकांकडून लाखो रुपयांचा दंड वसूल केला जातो. मात्र, नियमांची अंमलबजावणी करणारे काही पोलीस कर्मचारीच नियम मोडताना आढळल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. कायद्याचा आदर टिकवायचा असेल, तर नियमभंग करणाऱ्यांवर पद न पाहता समान कारवाई होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.



## भूमिका

**यंदाच्या मान्सूनबाबत हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केलेले अंदाज चिंताजनक आहेत. एप्रिलमध्ये सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला होता, तर मे महिन्यात तो आणखी घसरून ९० टक्क्यांवर आला. महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता आहे.**

# दुष्काळाचा इशारा; सरकार मात्र बेफिकीर




अल-निनोचा प्रभाव, हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ यामुळे पावसाची अनिश्चितता वाढत चालली आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने अधिक सजग आणि सक्रिय होण्याची गरज असताना त्याबाबतची उदासीनता चिंताजनक ठरते. पावसाचे प्रमाण किती राहील हे निसर्गाच्या हातात असले, तरी त्यातून निर्माण होणाऱ्या संकटांची तीव्रता प्रशासनाच्या तयारीवर अवलंबून असते. जगातील अनेक देशांनी याची जाणीव ठेवून

आधीच नियोजन सुरू केले आहे. ब्रिटनसारख्या देशांनी नागरिकांना पाणी बचतीसाठी मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. कमी पाणी वापरणारी साधने, पाणी वापराची नोंद ठेवणे, बागकामातील काटकसर अशा अनेक उपाययोजना तेथील प्रशासन सुचवत आहे. चीननेही संभाव्य दुष्काळ आणि अतिवृष्टीचा सामना करण्यासाठी पूर्वतयारी सुरू केली आहे.भारतामध्ये मात्र परिस्थिती वेगळी दिसते.

हवामान खात्याचे इशारे मिळूनही प्रशासनाच्या पातळीवर आवश्यक ती हालचाल जाणवत नाही. जलसंधारण, जलसाठ्यांचे व्यवस्थापन, तलाव आणि विहिरींचे पुनर्भरण, पाणी वापराचे नियमन अशा मूलभूत बाबींवर तातडीने काम होणे अपेक्षित आहे. राज्यातील धरणांमध्ये सध्या मर्यादित पाणीसाठा उपलब्ध आहे.

पाऊस कमी झाल्यास पुढील काही महिन्यांत पाणीटंचाई गंभीर रूप धारण करू शकते. त्यामुळे आजपासूनच पाणी बचतीची व्यापक मोहीम राबविणे आवश्यक आहे. विशेषतः शहरांमध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे. वाहन धुण्याची केंद्रे, गळती होणाऱ्या जलवाहिन्या, अनियंत्रित बोअरवेल्स आणि बेजबाबदार वापर यामुळे मौल्यवान पाणी वाया जाते. महापालिका आणि नगरविकास विभागाने यावर कठोर उपाययोजना करणे अपेक्षित आहे. दुर्दैवाने या विषयावर गंभीर चर्चा किंवा कृती फारशी दिसत नाही. शेती क्षेत्रातील परिस्थितीही तितकीच चिंताजनक आहे. पाणी बचतीसाठी ठिबक सिंचन प्रभावी उपाय मानला जातो. मात्र युद्धजन्य परिस्थितीमुळे कच्च्या मालाचे दर वाढल्याने ठिबक सिंचन साहित्य महाग झाले आहे. अशा वेळी शेतकऱ्यांना तातडीने अनुदान मंजुरी मिळणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात अनेक अर्ज महिनोनमहिने प्रलंबित राहतात. त्यामुळे पाणी बचतीची साधने उपलब्ध असूनही त्यांचा वापर वाढत नाही.

दुष्काळाचा इशारा हा केवळ हवामान खात्याचा अहवाल नसून तो प्रशासन आणि समाजासाठी धोक्याचा इशारा असतो. दुर्दैवाने आपल्याकडे संकट प्रत्यक्ष दारात येईपर्यंत त्याची दखल घेतली जात नाही. पाणी बचत, संसाधनांचे नियोजन आणि दीर्घकालीन उपाययोजना या बाबी तातडीने राबविल्या नाहीत, तर भविष्यातील दुष्काळ अधिक गंभीर ठरू शकतो. कोरडे आभाळ ही निसर्गाची बाब असली, तरी कोरडी प्रशासनिक इच्छाशक्ती मात्र समाजाला महागात पडू शकते.

## प्रासंगिक »

### घुबड आणि टोळ

**एका झाडाच्या ढोलीत एक म्हातारे घुबड दिवसा शांतपणे झोपले होते. त्याच झाडाखाली एक टोळ मोठ्याने गाणे गात होता. त्याच्या किरकिर आवाजामुळे घुबडाची झोप मोडली.**

घुबडाने नम्रपणे टोळाला दुसरीकडे जाऊन गाण्याची विनंती केली. परंतु टोळाने त्याचा अपमान केला आणि त्याला शिव्याही दिल्या. घुबडाने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, तरीही तो ऐकायला तयार नव्हता.

शेवटी घुबडाने युक्ती केली. त्याने टोळाच्या गाण्याची खोटी स्तुती केली. तो म्हणाला, “तुझा आवाज अतिशय मधुर आहे. तुझ्यासारखा गायक दुसरा नाही. माझ्याकडे अमृत आहे, ते पिऊन तुझा कोरडा झालेला गळा ताजा होईल.”

स्वतःच्या स्तुतीने खुश झालेला टोळ घुबडाजवळ गेला. त्याला तहानही लागली होती. संधी साधून घुबडाने त्याला पकडले आणि गिळून टाकले.

- तात्पर्य : आपल्या आवडीनिवडी इतरांवर लादू नयेत. दुसऱ्यांच्या भावना, गरजा आणि शांततेचा विचार न करणारा माणूस शेवटी स्वतःच्याच अहंकारामुळे संकटात सापडतो.

दक्षिण आशियातील अलीकडच्या राजकीय घडामोडींनी एक महत्त्वाचा संदेश दिला आहे—तरुणाईला दुर्लक्षित करून कोणतीही राजकीय व्यवस्था दीर्घकाळ टिकू शकत नाही.

# संतापाने धगधगणारी तरुणाई आणि बदलते राजकारण




श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ आणि भारतातील विविध आंदोलनांमध्ये ‘जेन झी’ अर्थात नव्या पिढीची भूमिका ठळकपणे समोर आली आहे. ही आंदोलने केवळ सत्ताधाऱ्यांविरोधातील उद्रेक नसून, राजकीय व्यवस्थेतील असंतोषाची तीव्र अभिव्यक्ती आहेत. कोविडनंतरच्या काळात जगभरातील सामाजिक आणि राजकीय वास्तव बदलले. डिजिटल माध्यमांच्या प्रभावामुळे तरुणांना माहिती, संवाद आणि संघटन यांची नवी साधने मिळाली. परंतु त्याचवेळी बेरोजगारी, आर्थिक असुरक्षितता, भ्रष्टाचार, घराणेशाही आणि निर्णयप्रक्रियेतून होणारे दुर्लक्ष यामुळे त्यांच्या मनात असंतोष वाढत गेला. या असंतोषाचे रूपांतर अनेक ठिकाणी रस्त्यावरच्या आंदोलनांमध्ये झाले. श्रीलंकेत २०२२ मध्ये आर्थिक संकटामुळे लोकांचा संयम सुटला. तरुणांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाने तत्कालीन सरकारला मोठे आव्हान दिले आणि अखेरीस सत्ताबदल घडवून आणला.

बांगलादेशात आरक्षणाच्या प्रश्नातून सुरू झालेला संघर्ष पुढे सरकारविरोधी चळवळीत परिवर्तित झाला. नेपाळमध्ये भ्रष्टाचार आणि सत्ताधाऱ्यांच्या ऐषआरामाविरोधातील संतापाने व्यापक आंदोलनाचे रूप घेतले. या सर्व घटनांमध्ये एक समान धागा दिसतो—तरुण पिढीचा व्यवस्थेविरोधातील रोष. मात्र केवळ संताप पुरेसा नसतो. आंदोलनांना दिशा, विचार आणि स्पष्ट उद्दिष्टे आवश्यक असतात. अन्यथा सत्ताबदल झाला तरी अपेक्षित परिवर्तन घडत नाही. इतिहास सांगतो की, तरुणांच्या ऊर्जेमुळे मोठे बदल शक्य होतात; परंतु त्या ऊर्जेला विधायक मार्ग मिळणे तितकेच महत्त्वाचे असते. विरोधासोबत पर्यायी धोरणे, मूल्ये आणि विकासाचा आराखडा मांडला गेला पाहिजे. आज दक्षिण आशियातील अनेक देशांमध्ये सत्ताधारी आणि तरुण पिढी यांच्यातील दरी वाढताना दिसते. लोकसंख्येचा मोठा हिस्सा असलेल्या तरुणांच्या अपेक्षा, प्रश्न आणि आकांक्षा यांना राजकीय प्रक्रियेत स्थान मिळणे गरजेचे आहे. अन्यथा असंतोषाचा उद्रेक पुन्हा पुन्हा होणार हे निश्चित. लोकशाही केवळ निवडणुकांवर चालत नाही; ती संवाद, सहभाग आणि विश्वास यांवर उभी असते. तरुणांना केवळ मतदार म्हणून नव्हे तर धोरणनिर्मितीतील भागीदार म्हणून स्वीकारण्याची वेळ आता आली आहे. अन्यथा संतापाने धगधगणारी तरुणाई रस्त्यावर उतरेल आणि सत्ताधाऱ्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



दुजा ऐंसा कोण बळी आहे आतां ।
हरि या अनंता पासूनिया ॥१॥

बळियाच्या आम्ही जालों बळिवंता ।
करूं सर्व सत्ता सर्वांवरी॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# हायव्होल्टेज ड्रामा अखेर संपला!

## विधान परिषदेसाठी महायुती आणि महाविकास आघाडीचे उमेदवार निश्चित

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून १८ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. गेल्या अडीच वर्षांपासून या निवडणुका लागल्या नव्हत्या. त्यामुळे गेल्या अडीच वर्षांपासून या आमदारकीच्या जागा रिक्त आहे. विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्य संख्येपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जातात. यंदा सोलापूर, अहमदनगर, ठाणे, जळगाव, नांदेड, सांगली-सातारा, यवतमाळ, पुणे, भंडारा- गोंदिया, नाशिक आणि अमरावतीच्या स्थानिक संस्थेच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक होत आहे.**

दरम्यान, काल उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. दुपारी ३ पर्यंत अर्ज भरता येणार होते. या निवडणुकीसाठी अनेकजण उत्सुक होते. त्यामुळे प्रचंड दावे-प्रतिदावे झाले. महायुती आणि महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेदही चव्हाट्यावर आले. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षांतर्गतच बंडाळी झाल्याचं दिसलं. पुण्यातून सुनील टिंगरे आणि विक्रम काकडे या दोघांनीही राष्ट्रवादीच्या तिकिटावर अर्ज भरला आहे. तर, छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीत वाद झाला. या जागेवरून भाजपाने सुहास शिरसाट यांना उमेदवारी दिली आहे, तर शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या समीर सत्तार यांनीही अपक्ष अर्ज भरला आहे.

प्रचंड रस्सीखेच आणि दावे-प्रतिदावे झाल्यानंतर महायुतीतून १७ जगांसाठी उमेदवारांची नाव निश्चित झाली आहेत. भाजपा ११, शिवसेना (एकनाथ शिंदे) ४, राष्ट्रवादी (अजित पवार) २ जागांवर निवडणूक लढवणार आहेत.

महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस ८ जागांवर, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष ५ जागांवर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) तीन जागांवर निवडणूक लढवणार आहे.



### भाजपा उमेदवारांची यादी

| | |
|---|---|
| वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली | - अरुण लखाणी |
| भंडारा-गोंदिया | - अविनाश ब्राह्मणकर |
| अमरावती | - प्रवीण पोटे |
| सोलापूर | - राजेंद्र राऊत |
| सांगली सातारा | - धैर्यशील कदम |
| अहिल्यानगर | - प्राजक्त तनपुरे |
| छत्रपती संभाजीनगर-जालना | - सुहास शिरसाट |
| नांदेड | - अमर राजूरकर |
| धाराशिव-बीड-लातूर | - बसवराज पाटील |
| जळगाव | - नंदकिशोर महाजन |
| नागपूर | - राजीव पोतदार |

### काँग्रेसच्या उमेदवारांची यादी

| | |
|---|---|
| चंद्रपूर-वर्धा-गडचिरोली | – शैलेश देशमुख |
| अमरावती | – हर्षदीप देशमुख |
| यवतमाळ | – साहेबराव कांबळे |
| लातूर | – महेश देशमुख |
| सोलापूर | – आदित्य फत्तेपूरकर |
| नागपूर | – अतुल लोंढे |
| भंडारा-गोंदिया | – दिलीप बनसोड, प्रफुल अग्रवाल आणि नरेश ईश्वरकर |

### शिवसेनेचे (ठाकरे) उमेदवार

| | |
|---|---|
| नाशिक | – अनिल कदम |
| परभणी- हिंगोली | – डॉ. विवेक नावंदर |
| छत्रपती संभाजीनगर – जालना | – देवयानी डोणगावकर |
| जळगाव | – शरद तायडे |
| रायगड-रत्नागिरी- सिंधुदुर्ग | – सुरेंद्रनाथ उर्फ बाळ माने |

### शिवसेना (शिंदे) उमेदवारांची नावे

| | |
|---|---|
| ठाणे | - रवींद्र फाटक |
| नाशिक | - नरेंद्र दराडे |
| परभणी-हिंगोली | - सईद खान |
| यवतमाळ | - दुष्यंत चतुर्वेदी |

### राष्ट्रवादीचे (अजित पवार) उमेदवार

| | |
|---|---|
| रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग | - अनिकेत तटकरे |
| पुणे | - विक्रम काकडे आणि सुनील टिंगरे |

### राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)

| | |
|---|---|
| सांगली-सातारा | – बाळासाहेब पाटील, अभयसिंह जगताप |
| पुणे | - श्रीकांत पाटील |
| ठाणे | - अभिजीत पवार |
| अपक्ष : छत्रपती संभाजीनगर-जालना | - समीर सत्तार |

## “भाजपाने आमचं मुंडकंच छाटलं”, शिंदेंच्या आमदाराचे गंभीर आरोप

**महाईन्यूज । छत्रपती संभाजीनगर**

**स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा महायुतीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. भाजपाने महापालिका, जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये आम्हाला हद्दपार केलंय, आमचा मोठा भाऊ आम्हाला संपवतोय, अशी खंत माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केली. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी अब्दुल सत्तार यांचा मुलगा समीर सत्तार यांनी छत्रपती संभाजी नगरमधून अपक्ष उमेदवारी अर्ज भरलाय. कारण, या जागेवरून भाजपाने (महायुती) सुहास शिरसाट यांना उमेदवारी दिली.**



महायुतीने सुहास शिरसाट यांना उमेदवारी दिलेली असताना समीर सत्तार यांनीही उमेदवारी अर्ज भरल्याने महायुतीतील वाद समोर आला. याबाबत अब्दुल सत्तार म्हणाले, “खरं म्हणजे आम्ही अर्ज भरला नाही. कार्यकर्त्यांनी अर्ज भरला आहे. सिल्लोड विधानसभा मतदारसंघात ५३ नगरसेवक आहेत. त्यामुळे मतदारांच्या भावना जपाव्या लागतात. सर्व गावाच्या लोकांनी आपआपल्या पद्धतीने माझ्या मुलाशी अप्रत्यक्ष संपर्क साधून त्यांनी अर्ज भरण्यास सांगितलं. त्यातून हा अर्ज भरलेला आहे. उद्या मला मुंबईला बोलावलं आहे. एकनाथ शिंदेंनी उद्या समन्वय बैठक बोलावली आहे. या बैठकीत ते काय आदेश देतात त्यावर उमेदवारीबाबत निर्णय घेतला जाईल. मी एकनाथ शिंदेंशी चर्चा करेन.”

दोन निवडणुका महत्त्वाच्या झाल्या. महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या. या ठिकाणीतर आम्ही तात्पुरते हद्दपार झालो आहोत. लोकशाहीत त्यांनी कसा त्यांचा पक्ष वाढवावा हा त्यांचा प्रश्न आहे. तिसरी निवडणूक मध्यवर्ती बँकेची लागली आहे. त्या निवडणूक नियोजनात आमच्या (शिंदेसेना) लोकांना हाताशी धरून जिल्हा मध्यवर्ती बँकेही ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू आहे, असाही दावा अब्दुल सत्तार यांनी केला.

# के. अन्नामलाई भाजपा सोडणार?

## दिल्लीत पक्षश्रेष्ठींची भेट घेऊन मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत!

**महाईन्यूज । तमिळनाडू**

**मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्षाने सत्ता काबीज केल्यापासून तमिळनाडूच्या राजकारणात सातत्याने घडामोडी घडताना दिसत आहेत. आता भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि दक्षिण भारतातील एक महत्त्वाचा चेहरा के. अन्नामलाई भाजपाला सोडचिठ्ठी देण्याच्या तयारीत आहेत. या घडामोडींशी परिचित असलेल्या भाजपाच्या अनेक वरिष्ठ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ते मंगळवारी दिल्लीत पक्षप्रमुख नितीन नवीन यांच्याकडे आपला निर्णय अधिकृतपणे सोपवण्याची शक्यता आहे.**



### रणनीतीत चूक?

तमिळनाडूतील भाजपाच्या एका वरिष्ठ नेत्याने खाजगीत सांगितले की, दिल्लीने निवडणुकीच्या वेळी तमिळनाडूची परिस्थिती ओळखण्यात चूक केली. जर अन्नामलाई यांना अधिक स्वायत्तता आणि महत्त्व दिले गेले असते, तर कदाचित विजय हे राज्यातील राजकीय बदलाचा एकमेव चेहरा बनले नसते.

अन्नामलाई सोमवारी रात्री दिल्लीला पोहोचणार असून, राजीनामा देण्यासाठी ते नबीन यांची भेट घेतील अशी अपेक्षा आहे. भाजपामधील विश्वसनीय सूत्रांनी सांगितले की, त्यांनी आधीच याबाबत निर्णय घेतला आहे. त्यांचा हा दिल्ली दौरा केवळ एक राजकीय भेट नसून, ज्या पक्षासोबत त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातील गेली सहा वर्षे घालवली, त्या पक्षाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे. या चर्चेची माहिती असलेल्या एका वरिष्ठ सूत्राने सांगितले, "आयपीएस (IPS) पदाचा राजीनामा दिल्यानंतर भाजपाने त्यांना ज्या संधी, अनुभव आणि राजकीय प्रवास दिला, त्याबद्दल त्यांना नेतृत्वाचे आभार मानायचे आहेत."

गेल्या काही आठवड्यांपासून अन्नामलाई यांच्या भविष्याविषयीच्या चर्चांनी चेन्नई आणि दिल्ली या दोन्ही ठिकाणच्या राजकीय वर्तुळात धुमाकूळ घातला होता. माध्यमांवर ते नवीन राजकीय संघटना स्थापन करण्याच्या तयारीत आहेत का, यावर वादविवाद होत होते आणि सोशल मीडियावर दररोज नवनवे तर्क लढवले जात होते. अफवांचा बाजार तापलेला असतानाही, अन्नामलाई यांनी या विषयावर प्रतिक्रिया देणे टाळले होते. त्यामुळे अन्नमलाई हे खरंच राजीनामा देणार का? आणि राजीनामा दिल्यानंतर त्यांचं पुढचं राजकीय पाऊल काय असणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अन्नामलाई नाराज आहेत का? यावर सध्या चर्चा नसून, त्यांना नेमके काय हवे आहे? हा प्रश्न उपस्थित होतोय. ही चर्चा केवळ भाजपसमोरीलच नव्हे, तर विजय यांच्या उदयानंतर तामिळनाडूतील जवळपास प्रत्येक प्रस्थापित राजकीय शक्तीसमोर निर्माण झाली आहे. गेल्या जवळपास अर्ध्या दशकापासून अन्नामलाई यांना राज्यातील भाजपाचा चेहरा म्हणून सादर केले जात होते. त्यांनी भारतीय पोलीस सेवेचा (IPS) राजीनामा दिला, अत्यंत तरुण वयात राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच ते पक्षाचा सर्वात प्रमुख चेहरा बनले. त्यांच्या विरोधकांनीही त्यांची ऊर्जा, संघटनात्मक कौशल्य आणि राजकीय चर्चांवर पकड मिळवण्याची त्यांची क्षमता मान्य केली. तरीही, त्यांची राजकीय ओळख अनेकदा भाजपाच्या पारंपारिक चौकटीत पूर्णपणे बसत नव्हती.

इतर राज्यातील अनेक कट्टर नेत्यांप्रमाणे, अन्नामलाई यांनी आपले राजकारण कधीही उघड जातीय वक्तव्यांभोवती केंद्रित केले नाही. त्यांच्या भाषणांमध्ये अनेकदा तमिळ अस्मिता, सुशासन, भ्रष्टाचार, विकास आणि प्रशासकीय सुधारणा या मुद्द्यांचा भर असायचा. ते भाजपाची एक अशी आवृत्ती शोधण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसत होते, जी तमिळ भाषेच्या राजकीय संस्कृतीशी सुसंगत असेल.

# बंगालमध्ये मंत्रिमंडळ विस्तार, ३५ आमदारांनी घेतली शपथ

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**पश्चिम बंगालमध्ये भाजपाचं सरकार आलं आहे. त्यानंतर तीन आठवड्यांनी सुवेंदु अधिकारी यांच्या मंत्रिमंडाळाचा विस्तार करण्यात आला आहे. ३५ आमदारांनी आज शपथ घेतली आहे. सोमवारी हा एका खास सोहळ्यात ३५ आमदारांचा शपथविधी पार पडला. यामध्ये १३ कॅबिनेट मंत्री, १९ राज्य मंत्री आणि ३ स्वतंत्र प्रभार मंत्री आहेत. कॅबिनेटचा विस्तार केल्यानंतर पश्चिम बंगालच्या मंत्रिमंडळात ४१ मंत्री झाले आहेत.**




अर्जुन सिंह, तापस रॉय, शरदवत मुखर्जी, जगन्नाथ चट्टोपाध्याय, शंकर घोषण या मंत्र्यांनी शपथ घेतली. पश्चिम बंगालच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला त्यात दीपक बर्मन, मनोज उरांव, गौरी शंकर घोष, स्वपन दासगुप्ता, दुध कुमार मंडल यांनीही मंत्री म्हणून शपथ घेतली. भाजपाच्या नेतृत्वाने म्हटलं आहे की विस्तारीत मंत्रिमंडळात विविध सामाजिक वर्गांना आणि स्थानिकांना संधी देण्याचा आम्ही आमच्या परिने प्रयत्न केला आहे. पहिल्या टप्प्यात शपथ घेणाऱ्या मंत्र्यांमध्ये महिला, मतुआ आणि राजवंशी तसंच आदिवासी समुदायाच्या प्रतिनिधींना स्थान देण्यात आलं. औसग्रामच्या आमदार कलिता माजी यांनी गृहसेविका म्हणूनही काम केलं होतं. त्यांना राज्य मंत्री म्हणून शपथ देण्यात आली आहे. पश्चिम बंगालमध्ये कॅबिनेट विस्तार करुन भाजपा सरकारने विविध विभाग वाटपांमध्ये विविध प्रकारच्या लोकांना जबाबदारी दिली आहे. सरकारने निवडणुकीच्या आधी जी आश्वासनं दिली होती त्या योजना आता कार्यान्वित होतील अशी अपेक्षा आता सगळ्यांनाच आहे.

### कॅबिनेट मंत्री कोण आहेत?

दीपक बर्मन, तपस रॉय, डॉ. शंकर घोष, मनोज कुमार उरांव, अर्जुन सिंह, स्वपन दासगुप्ता, जगन्नाथ चॅटर्जी, कल्याण चक्रवर्ती, अजय पोद्दार, शाश्वत मुखर्जी, दूधकुमार मंडल, अनुप कुमार दास.

### राज्यमंत्री कोण झालं आहे?

ज्वेल मुर्मू, हरे कृष्ण बेरा, आनंदमय बर्मन, अशोक डिंडा, नदियार चंद बाउरी, विशाल लामा, शांतनु प्रामाणिक, मौमिता बिस्वास मिश्रा, उमेश रॉय, पूर्णिमा चक्रवर्ती, कौशिक चौधरी, भास्कर भट्टाचार्य, दिवाकर घरामी, अमिया किस्कू, कलिता माझी, गर्गी दास घोष, बिराज बिस्वास, दीपांकर जना, सुमना सरकार.

### राज्य मंत्री स्वतंत्र प्रभार कोण आहेत?

डॉ. इंद्रनील खान, मालती रावा रॉय, राजेश महतो.



# श्रीदेवींच्या आठवणींना जान्हवीचा उजाळा

अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या तिच्या आगामी 'पेड्डी' या चित्रपटाच्या निमित्ताने चर्चेत आहे. चित्रपटाच्या प्रचारादरम्यान दिलेल्या एका मुलाखतीत तिने तिची आई, दिवंगत अभिनेत्री श्रीदेवी यांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच तिची वारंवार आईशी होणारी तुलना आणि त्या संदर्भातील भावना देखील तिने व्यक्त केल्या. जान्हवीने सांगितले की, लहानपणी तिला तिची आई एक मोठी अभिनेत्री आहे हे माहीत होते, मात्र तिची लोकप्रियता आणि प्रेक्षकांमधील असलेले अफाट प्रेम किती मोठे होते, याची जाणीव नंतर झाली. श्रीदेवींनी अगदी लहान वयात अभिनय क्षेत्रात प्रवेश केला होता. स्वभावाने त्या खूप शांत आणि लाजाळू होत्या, पण मेहनत, समर्पण आणि अभिनयावरील प्रेम यांच्या जोरावर त्यांनी यशाचे शिखर गाठले. जान्हवीच्या मते, तिच्या आईची सर्वात मोठी खासियत म्हणजे कोणतेही काम पूर्ण मनापासून करणे. अभिनय करताना त्यांनी स्वतःला त्या भूमिकेत झोकून दिले आणि जेव्हा कुटुंबाला वेळ देण्याची गरज भासली, तेव्हाही त्यांनी तेवढ्याच निष्ठेने कुटुंबाची जबाबदारी सांभाळली. ती म्हणाली की, श्रीदेवींनी त्यांच्या करिअरच्या अत्यंत यशस्वी टप्प्यावर कुटुंबाला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी अभिनयापासून काही काळ दूर राहून मुली आणि कुटुंबासाठी स्वतःला पूर्णपणे समर्पित केले. त्या काळात त्यांनी एक आदर्श आई आणि पत्नी म्हणून सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्यामुळे मोठे होईपर्यंत जान्हवीला तिच्या आईची एक प्रेमळ, साधी आणि कुटुंबवत्सल प्रतिमाच अधिक जवळून पाहायला मिळाली. नंतर मुली मोठ्या झाल्यावर श्रीदेवींनी पुन्हा अभिनय क्षेत्रात पुनरागमन केले. अभिनयाविषयी बोलताना त्यांनी जान्हवीला एक महत्त्वाचा सल्ला दिला होता. त्या म्हणायच्या, "कॅमेऱ्यासमोर तुम्ही खोटे बोलू शकत नाही. चांगली अभिनेत्री होण्यासाठी आधी चांगली व्यक्ती असणे गरजेचे आहे." हा सल्ला आजही जान्हवीच्या मनात कायम आहे. जान्हवी कपूरची तुलना अनेकदा तिच्या आईशी केली जाते. या विषयावर बोलताना तिने अत्यंत नम्रपणे सांगितले की, श्रीदेवींसारखी अभिनेत्री दुसरी कोणी होऊ शकत नाही आणि भविष्यातही होणार नाही. तिच्या मते, लोक तिच्याकडून आईची हुबेहुब प्रतिकृती होण्याची अपेक्षा करत नाहीत. मात्र, आईने निर्माण केलेला अभिनयाचा वारसा सन्मानाने पुढे नेण्याची अपेक्षा नक्कीच असते. ती म्हणाली की, हा वारसा पुढे नेणे खूप मोठी आणि आव्हानात्मक जबाबदारी आहे. तरीही ती प्रत्येक भूमिकेतून आणि प्रत्येक संधीतून त्या वारशाचा सन्मान राखण्याचा प्रयत्न करते. चित्रपटसृष्टीत मिळालेल्या प्रत्येक संधीबद्दल ती स्वतःला भाग्यवान समजते. आईच्या आठवणींबद्दल बोलताना जान्हवी भावूक झाली. ती म्हणाली की, जेव्हा ती कॅमेऱ्यासमोर उभी राहते किंवा तिरुपतीच्या दर्शनासाठी जाते, तेव्हा तिला आईच्या अधिक जवळ असल्याची भावना होते. अभिनय आणि तिरुपती हे तिच्यासाठी केवळ काम किंवा श्रद्धेची ठिकाणे नाहीत, तर आईशी जोडणारे भावनिक धागे आहेत. आजही तिला अनेकदा असे वाटते की, आई कुठेतरी प्रवासाला गेली आहे आणि लवकरच परत येईल. मात्र वास्तव वेगळे असल्याची जाणीव मनाला वेदना देते. हे दुःख कधीच पूर्णपणे कमी होणार नाही, असे सांगत तिने आईबद्दलच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. जान्हवीच्या या भावना तिच्या आईबद्दलचे प्रेम, आदर आणि जिव्हाळा स्पष्टपणे दाखवून देतात. अभिनयाच्या माध्यमातून ती आजही श्रीदेवींच्या आठवणी जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.



# तापसी पन्नूचा महिलांना महत्त्वाचा सल्ला



बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नू तिच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाते. अभिनयासोबतच ती अनेक सामाजिक आणि वैयक्तिक विषयांवर खुलेपणाने मत मांडत असते. नुकतेच तिने शरीराची ठेवण, फिटनेस आणि महिलांवर असणारा 'परफेक्ट फिगर'चा दबाव याबाबत मनमोकळेपणाने भाष्य केले आहे. तसेच तरुणींना आणि महिलांना स्वतःच्या अनुभवातून महत्त्वाचा सल्लाही दिला आहे. तापसीने सोशल मीडियावर तिच्या आयुष्यातील एका कठीण टप्प्याबद्दल सांगितले. ती म्हणाली की, एक काळ असा होता जेव्हा सपाट पोट आणि परिपूर्ण शरीरयष्टी मिळवण्याचे तिला प्रचंड वेड लागले होते. लहानपणापासून ती फिट होती, मात्र पोटाच्या खालच्या भागातील चरबी पूर्णपणे कमी होत नव्हती. त्यामुळे ती सतत त्याबद्दल विचार करत असे. ही चरबी कमी करण्यासाठी तापसीने खूप मेहनत घेतली. तिने जास्तीत जास्त व्यायाम करण्यास सुरुवात केली. मात्र हे करताना तिने स्वतःच्या शरीराच्या मर्यादांकडे दुर्लक्ष केले. ती इतकी कसरत करू लागली की तिचे शरीर आणि मन दोन्ही थकून जात होते. तापसीने सांगितले की, जेव्हा आपण शरीरावर अतिप्रमाणात ताण आणतो, तेव्हा शरीर स्वतःचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करते. अशा वेळी शरीरातील काही नैसर्गिक प्रक्रिया बदलतात. शरीर अतिरिक्त पाणी साठवून ठेवू लागते. त्यामुळे पोटाच्या खालच्या भागात सूज किंवा फुगलेपणा दिसू शकतो. अनेकदा लोक त्याला केवळ चरबी समजतात, पण त्यामागे इतर शारीरिक कारणेही असू शकतात. तिने स्पष्ट केले की, अधिक व्यायाम केल्याने नेहमीच अपेक्षित परिणाम मिळतील असे नाही. उलट काही वेळा त्याचा शरीरावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे स्वतःला अनावश्यक त्रास देऊ नये, असे तिने सांगितले. तापसीच्या मते, प्रत्येक महिलेचे शरीर वेगळे असते. प्रत्येकाची शारीरिक रचना, चयापचय प्रक्रिया आणि आरोग्याची गरज वेगळी असते. त्यामुळे इतरांशी तुलना करण्याऐवजी स्वतःच्या शरीराचा स्वीकार करणे अधिक महत्त्वाचे आहे. ती म्हणाली की, काही दिवस शरीर अधिक सडपातळ दिसते, तर काही दिवस पोट थोडे फुगलेले वाटू शकते. हे पूर्णपणे नैसर्गिक आहे. अशा बदलांमुळे घाबरण्याची किंवा स्वतःवर कठोर होण्याची गरज नाही. तापसीने तिच्या आहारतज्ज्ञाने दिलेल्या सल्ल्याचाही उल्लेख केला. तिने सांगितले की, पोटाच्या खालच्या भागात थोडी चरबी आणि काही प्रमाणात पाणी साठणे हे महिलांच्या शरीरासाठी नैसर्गिक आणि आवश्यक असते. कारण त्या भागात प्रजननाशी संबंधित अवयव असतात आणि त्यांच्या संरक्षणासाठी शरीर ही रचना तयार करते. यामुळे त्या भागात थोडा उभार असणे हे आरोग्यदायी असू शकते. त्यामुळे सोशल मीडियावर दिसणाऱ्या परिपूर्ण छायाचित्रांप्रमाणे दिसण्यासाठी स्वतःला त्रास देऊ नका, असे आवाहन तापसीने केले. तिने महिलांना संदेश देताना सांगितले की, आरोग्य हे सौंदर्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. शरीर निरोगी ठेवण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि मानसिक स्वास्थ्य यावर भर देणे गरजेचे आहे. केवळ बाह्य सौंदर्यासाठी किंवा सोशल मीडियावरील अपेक्षांसाठी स्वतःच्या आरोग्याशी तडजोड करू नये.

# भारतात फिफा विश्वचषकाचे थेट प्रक्षेपण

## फिफा विश्वचषक सुरु होत असून, अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडामध्ये हे सामने खेळवले जाणार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**'फिफा विश्वचषक' २०२६ (FIFA World Cup) स्पर्धांचे भारतात थेट प्रक्षेपण 'झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस लिमिटेड'च्या (ZEEL) नव्याने सुरू झालेल्या 'Unite8 Sports' या टीव्ही चॅनेल्सवर होणार आहे. ४८ संघ सहभाग घेणाऱ्या फुटबॉल महाकुंभमेळ्यघचे थेट प्रक्षेपण 'Zee5' या ॲपवरही उपलब्ध असेल. ११ जूनपासून फिफा विश्वचषकाला सुरुवात होत असून, अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या देशांमध्ये हे सामने खेळवले जाणार आहेत. फिफा आणि जिओस्टार (JioStar) यांच्यात चालू आणि आगामी स्पर्धांच्या किमतीबाबत एकमत न झाल्यामुळे या शर्यतीत 'ZEEL'ने उडी घेतली होती.**




झी ने आपली काही मनोरंजन चॅनेल्स बंद करून, त्याऐवजी हिंदीत 'UNITE8 SPORTS 1' व 'UNITE8 SPORTS 1 HD' आणि इंग्रजीत 'UNITE8 SPORTS 2' व 'UNITE8 SPORTS 2 HD' ही चॅनेल्स बाजारात आणली आहेत. भारतीय वेळेनुसार, बहुतांश सामने मध्यरात्रीनंतर सुरू होणार आहेत. वेळेतील या फरकामुळे भारतीय प्रसारक यामध्ये फारशी उत्सुकता दाखवत नव्हते, हा एक मोठा अडथळा होता. यापूर्वी २०२२ मध्ये कतार येथे झालेला फिफा विश्वचषक भारतासाठी अनुकूल वेळेत होता, त्याचे प्रक्षेपण हक्क व्हायकॉम१८ (VIACOM18 - जो आता जिओस्टारचा भाग आहे) ने ६२ दशलक्ष डॉलर्सला खरेदी केले होते.

रॉयटर्सने यापूर्वी दिलेल्या वृत्तानुसार, फिफाने सुरुवातीला २०२६ आणि २०३० च्या विश्वचषकांचा समावेश असलेल्या 'भारत पॅकेज'साठी सुमारे १०० दशलक्ष डॉलर्सची मागणी केली होती; मात्र, त्यानंतर त्यांनी आपली ही मागणी ६० दशलक्ष डॉलर्सपर्यंत कमी केली. चीनमध्ये याचे हक्क घेणाऱ्या 'चायना मीडिया ग्रुप'ने आगामी आवृत्तीसाठी ६२ दशलक्ष डॉलर्स मोजल्याचे समजते. जिओस्टारने २०२६ च्या फिफा विश्वचषकाचे मूल्य २० दशलक्ष डॉलर्स लावले होते, जे फिफाला मान्य नव्हते. आता झालेल्या व्यवहाराबाबत आर्थिक तपशील उघड करण्यात आले नाहीत. झी एंटरटेनमेंटने (ZEEL) गेल्या वर्षीच क्रीडा प्रसारण क्षेत्रात पुन्हा उतरण्याची इच्छा व्यक्त केली होती. आठ वर्षांपूर्वी त्यांनी आपली स्पोर्ट्स चॅनेल्स 'कल्वर मॅक्स एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड'ला (सोनी पिक्चर्स नेटवर्क इंडियाचे कॉर्पोरेट नाव) विकली होती. 'ZEEL'चे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पुनीत गोयंका म्हणाले की, "जगातील सर्वात मोठ्या क्रीडा स्पर्धांपैकी एक असलेल्या फिफाला भारतीय प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना आम्हाला आनंद होत आहे. फुटबॉल हा खेळ प्रादेशिक आणि सामाजिक सीमांच्या पलीकडे जाणारा आहे. माध्यम हक्क मिळवण्यासाठी आणि हक्काची स्पोर्ट्स चॅनेल्स सुरू करण्यासाठी आम्ही केलेली गुंतवणूक, ही या खेळाच्या भविष्यातील क्षमतेवर आमचा असलेला विश्वास दर्शवते."

### इतर महत्त्वाच्या फिफा स्पर्धांचे भारतात प्रक्षेपण

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, 'UNITE8 SPORTS' या टीव्ही चॅनेल्स २०२६ आणि २०३० चे पुरुष फिफा विश्वचषक, २०२७ चा फिफा महिला विश्वचषक आणि २०३४ पर्यंतच्या इतर महत्त्वाच्या फिफा स्पर्धांचे भारतात प्रक्षेपण करतील. यामध्ये फिफाच्या डॉक्यु-सीरिज (माहितीपट)चाही समावेश असेल.पुरुष आणि महिला फिफा विश्वचषकाव्यतिरिक्त, 'झी' (Z) समूह अंडर-१७ विश्वचषक, महिला अंडर-१७ विश्वचषक, अंडर-२० विश्वचषक, महिला अंडर-२० विश्वचषक, फुटसाल विश्वचषक, महिला फुटसाल विश्वचषक आणि इंटरकॉन्टिनेंटल कपचे देखील प्रक्षेपण करणार आहे.

# गुजरात टायटन्सच्या पराभवानंतर सुनील गावसकरांचे वादग्रस्त विधान

**महाईन्यूज । अहमदाबाद**

**आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सचा पराभव झाल्यानंतर स्पर्धेच्या नियोजनावरून एक नवा वादंग निर्माण झाला आहे. क्रिकेट विश्वातील दिग्गज सुनील गावसकर यांनी थेट 'आयपीएल फायनल पुढे ढकलायला हवी होती,' असे विधान करून खळबळ उडवून दिली आहे. गुजरात टायटन्सच्या संघाने अत्यंत कमी अवधीत सलग सामने खेळल्यामुळे त्यांना पुरेशी विश्रांती आणि तयारीसाठी पुरेसा वेळ मिळाला नव्हता, हा या वादाचा मुख्य केंद्रबिंदू आहे.**



गुजरात टायटन्सचा संघ क्वालिफायर २ मध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्ध सामना खेळल्यानंतर अहमदाबादला रवाना झाला होता. मात्र, खराब हवामानाचा फटका बसल्याने त्यांच्या प्रवासात मोठा व्यत्यय आला. ३० मे रोजी उशिरा रात्री अहमदाबादला पोहोचल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी म्हणजेच ३१ मे रोजी त्यांना आरसीबीविरुद्ध निर्णायक अंतिम सामना खेळावा लागला. या धकाधकीच्या प्रवासामुळे खेळाडूंच्या तयारीवर विपरीत परिणाम झाला, असे मत व्यक्त होत आहे. गुजरात संघाने अवघ्या ६ दिवसांत तीन महत्त्वाचे सामने खेळले होते, ज्यासाठी त्यांना वेगवेगळ्या शहरांत प्रवासही करावा लागला होता.





दुसरीकडे, गुजरात टायटन्सचे संचालक विक्रम सोलंकी यांनी पराभवानंतर आपली बाजू मांडताना वस्तुस्थितीवर प्रकाश टाकला. सोलंकी म्हणाले, "हवामानावर आमचे नियंत्रण नाही, त्यामुळे आमचे आगमन लांबणीवर पडले यात आमचा काहीही दोष नाही. कमी दिवसांत अनेक सामने खेळणे हे नक्कीच आव्हानात्मक होते. आम्ही हरलो आहोत आणि आमचा प्रवास इथेच थांबला आहे, याचे समर्थन म्हणून मी हे सांगत नाहीये. आम्हाला आरसीबीला आव्हान देण्याची संधी होती, पण त्या दिवशी आरसीबीचा खेळ सरस ठरला. आम्ही किती उशिरा पोहोचलो, या गोष्टींना आता विशेष अर्थ उरलेला नाही."

गुजरात टायटन्सच्या या पराभवामुळे आता आयपीएलच्या वेळापत्रकातील त्रुटी आणि खेळाडूंच्या वर्कलोड मॅनेजमेंटवर पुन्हा एकदा मोठ्या चर्चेला सुरुवात झाली आहे.

### सुनील गावसकरांची पराभवानंतर स्पष्ट भूमिका

'इंडिया टुडे'शी संवाद साधताना सुनील गावसकर यांनी खेळाडूंच्या मानसिक आणि शारीरिक स्थितीवर भाष्य केले. गावसकर म्हणाले, "अशा परिस्थितीत केवळ खेळाडूंचे शारीरिक स्वास्थ्यच नाही, तर त्यांची मानसिक एकाग्रताही विचलित होते. आपल्या विमानाचे उड्डाण कधी होणार, हेच जेव्हा खेळाडूंना ठाऊक नसते, तेव्हा साहजिकच तणाव वाढतो आणि त्याचा थेट परिणाम संघाच्या कामगिरीवर होतो." ते पुढे म्हणाले, "खेळाडूंना पुरेसा आराम मिळणे गरजेचे असते, आणि गुजरात टायटन्सच्या बाबतीत जे घडले ते पूर्णपणे अनपेक्षित होते. जेव्हा स्पर्धेत आधीपासूनच 'रिझर्व्ह डे'ची तरतूद उपलब्ध आहे, तर खेळाच्या निष्पक्षतेचा विचार करून अंतिम सामना एक दिवस पुढे ढकलून सोमवार, १ जून रोजी खेळवता आला असता. यामुळे गुजरात टायटन्सलाही तयारीसाठी समान संधी मिळाली असती."

स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। मंगळवार ।
दि. 02 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# ६० कोटींच्या प्रकरणात बदलीचा मुलामा; शिक्षा कुठे?

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील गाजलेल्या ६० कोटी रुपयांच्या उपसूचना घोटाळा प्रकरणानंतर वादाच्या केंद्रस्थानी असलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांची अखेर पदावरून उचलबांगडी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने काढलेल्या प्रशासकीय बदली आदेशानुसार नवी मुंबई महापालिकेतील मुख्य लेखा अधिकारी सत्यवान किशनराव उबाळे यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

महापालिकेतील सुमारे ६० कोटी रुपयांच्या उपसूचना घोटाळ्यामुळे प्रवीण जैन यांचे नाव राज्यभर चर्चेत आले होते. या प्रकरणात आर्थिक अनियमितता, नियमबाह्य व्यवहार आणि वित्तीय प्रक्रियेतील गंभीर त्रुटींवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. त्यानंतर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी चौकशी समिती नेमून तपास सुरू केला होता.

चौकशीदरम्यान महापालिकेच्या ठेवींवरील व्याज व्यवहारांमध्येही कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराचे मुद्दे समोर आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे जैन यांच्या भूमिकेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले होते. मात्र, चौकशी अहवाल शासनाकडे सादर झाल्यानंतरही कठोर कारवाई करण्याऐवजी केवळ बदलीचा निर्णय घेतल्याने नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.


दरम्यान, राज्यातील लेखा व वित्त विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांच्या आदेशात सत्यवान उबाळे यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेत नियुक्ती करण्यात आली आहे. आर्थिक व्यवहारांबाबत निर्माण झालेल्या संशयाच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. नवीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून उबाळे यांच्यासमोर आर्थिक शिस्त प्रस्थापित करणे, प्रलंबित चौकशींचा पाठपुरावा करणे आणि महापालिकेच्या वित्तीय व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास पुन्हा निर्माण करण्याचे मोठे आव्हान असणार आहे. दरम्यान, घोटाळ्याप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर नेमकी काय कारवाई होणार, याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

## चौकशी गुंडाळली जाणार?

प्रवीण जैन यांची बदली झाली असली तरी उपसूचना घोटाळा आणि ठेवींच्या व्याजातील गैरव्यवहाराबाबत चौकशी सुरू आहे. तसेच पालिकेतील सत्ताधाऱ्यांना देखील हे प्रकरण आता नकोसे झाले आहे. त्यामुळे बदली झाल्यानंतर या प्रकरणावर सुरू असलेली चौकशी सुरू राहणार की दबावात गुंडाळली जाणार याकडे लक्ष लागले आहे.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026




*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# फुगेवाडी दारूकांडमध्ये मृतांचा आकडा 15 वर

## विषारी दारू प्रकरणानंतर रुग्णालयांमध्ये उपचार सुरू, प्रशासन आणि कुटुंबीयांची चिंता कायम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**फुगेवाडीतील विषारी दारूकांडाने पिंपरी-चिंचवड शहराला मोठा हादरा दिला असून, मृतांचा आकडा 15 वर पोहोचला आहे. रविवारी (दि. 31) मृत्यूचे सत्र काहीसे थांबल्याचे चित्र दिसत असले तरी विविध रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेले दहा जण अद्याप धोक्याबाहेर आलेले नाहीत. त्यामुळे वैद्यकीय यंत्रणा, प्रशासन आणि रुग्णांच्या कुटुंबियांची चिंता कायम आहे.**



महिला तीन दिवसांत मृतांचा आकडा सातत्याने वाढत राहिल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी आणखी दोन जणांचा मृत्यू झाल्यानंतर बळींची संख्या 15 वर पोहोचली. त्यानंतर वैद्यकीय पथकांचे लक्ष पूर्णपणे उपचार सुरू असलेल्या रुग्णांकडे केंद्रित झाले आहे. विषारी दारूचा शरीरातील विविध अवयवांवर परिणाम झाल्याने काही रुग्णांवर अतिदक्षता विभागात विशेष उपचार सुरू आहेत.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) सध्या पाच रुग्ण उपचार घेत आहेत. श्रीमंत कोळी (वय 60), प्रकाश राठोड (वय 65), जितू शदतपुरी (वय 31), सोनू तायडे (वय 30) आणि प्रफुल्ल अरिकस्वामी (वय 27) यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या रुग्णांच्या प्रकृतीवर तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक सातत्याने लक्ष ठेवून आहे.

औंध येथील जिल्हा रुग्णालयात चंदन कुमार (वय 26), खाजप्पा शिंगे (वय 35) आणि पवन चव्हाण (वय 35) यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीत स्थिरता असल्याचे सांगण्यात येत असले तरी डॉक्टरांकडून सतत निरीक्षण ठेवण्यात येत आहे. सुभाष डिग्गीकर (वय 66) यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, अस्लम खान (वय 40) यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या सर्व रुग्णांच्या प्रकृतीबाबत नियमित आढावा घेतला जात आहे. रविवारी दिवसभरात शहरातील कोणत्याही सरकारी अथवा खासगी रुग्णालयात या प्रकरणाशी संबंधित नवीन रुग्ण दाखल झाल्याची नोंद झालेली नाही. त्यामुळे आणखी शक्यता कमी झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

### दारूकांडानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांचा मोठा धडाका

फुगेवाडी परिसरातील विषारी दारू प्रकरणात 14 नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर शहर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. या घटनेनंतर पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी तातडीची बैठक घेऊन अवैध दारू व्यवसायांविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार, सर्व झोनमधील उपायुक्त, वरिष्ठ पोलिस निरीक्षक आणि गुन्हे शाखेच्या पथकांना त्यांच्या हद्दीतील अवैध धंद्यांची माहिती संकलित करून तातडीने धाडसत्र राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### नातेवाइकांमध्ये चिंता

फुगेवाडी आणि दापोडी परिसरात या दुर्घटनेची तीव्रता अजूनही जाणवत आहे. मृतांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, अनेक घरांतील कर्त्या व्यक्ती गमावल्याने आर्थिक प्रश्न निर्माण झाले आहेत. रुग्णालयांबाहेर नातेवाईकांची प्रतीक्षा आणि चिंतेचे वातावरण कायम असून, प्रत्येक वैद्यकीय अपडेटकडे कुटुंबियांचे लक्ष लागले आहे. दरम्यान प्रशासनाने सर्व रुग्णालयांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. दुर्घटनेनंतर सुरू झालेली ही मोहीम तात्पुरती न राहता सातत्याने सुरू राहते का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

# स्वच्छ पिंपरी-चिंचवडसाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा; महापौर रवि लांडगे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक पिंपरी-चिंचवड घडविण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन राबविलेले स्वच्छता उपक्रम शहरासाठी प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपळे गुरव येथील पीडब्ल्यूडी मैदान ते डायनासोर गार्डन परिसरात वर्ल्ड मिशन सोसायटी चर्च ऑफ गॉड असोसिएशन (WMSCOGA) यांच्या वतीने आयोजित स्वच्छता अभियान व पर्यावरण जनजागृती मोहिमेत महापौर रवि लांडगे यांनी सहभाग घेत स्वयंसेवकांचे कौतुक केले.

या उपक्रमात स्वयंसेवक, स्थानिक नागरिक तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसरातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि मोकळ्या जागांमधील कचरा संकलित केला. मोहिमेदरम्यान सुमारे २ हजार किलोहून अधिक कचरा हटविण्यात आल्याने परिसर अधिक स्वच्छ व सुंदर झाला.

स्वच्छता मोहिमेबरोबरच पर्यावरण संवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि हवामान बदल याविषयी जनजागृती करण्यात आली. स्वयंसेवकांनी नागरिकांशी संवाद साधून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दिला.

महापौरांनी या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांचे अभिनंदन करत भविष्यातही अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांना महानगरपालिकेचे सहकार्य कायम राहील, अशी महापौर रवी लांडगे यांनी ग्वाही दिली.

या यशस्वी उपक्रमामुळे नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांच्या समन्वयातून शहर स्वच्छता चळवळीला नवी ऊर्जा मिळाली असून स्वच्छ व हरित पिंपरी-चिंचवडच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे.

यावेळी स्वयंसेवकांनी प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्याचा संकल्प करत नागरिकांना कचरा वर्गीकरणाचे महत्त्व पटवून दिले. शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला.

पर्यावरण संरक्षणासाठी सामूहिक सहभाग आवश्यक असून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतात, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. नागरिकांनीही स्वच्छता आणि हरित पर्यावरणासाठी नियमितपणे अशा मोहिमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता वाढण्यास मोठी मदत झाली.



> “स्वच्छता ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांच्या संयुक्त सहभागातूनच स्वच्छ व हरित पिंपरी-चिंचवडची संकल्पना प्रत्यक्षात उतरू शकते. भविष्यातील पिढ्यांना स्वच्छ आणि निरोगी वातावरण देण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.”
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# महापालिकेच्या इलेक्ट्रिक वाहनांवर वाढता खर्च

## प्रदूषण कमी करण्याच्या नावाखाली खर्च दुपटीने वाढल्याचा दावा; धोरणावर पर्यावरणप्रेमींची टीका

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने गेल्या तीन वर्षांपासून इलेक्ट्रिक वाहने वापरण्याची संख्या वाढली आहे. ती सर्व वाहने विकत, तसेच भाड्याने घेतली जात आहेत. त्यामुळे वायू व ध्वनी प्रदूषण होत कमी होत असून, खर्च काही कमी झालेला नाही. उलट, वाहनांवरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धन, ग्लोबल वॉर्मिंग, इंधन बचतीच्या नावाखाली महापालिकेकडून उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप होत आहे.**



महापालिकेकडून गेल्या तीन वर्षांपासून इलेक्ट्रिक वाहने वापरण्यात येत आहेत. त्यातून खर्च कमी होईल, असे अपेक्षित होते. मात्र, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढण्यासोबत खर्च दुप्पटीपेक्षा अधिकने वाढला आहे. महापालिकेने आत्तापर्यंत एकूण 58 इलेक्ट्रिक वाहने भाडे तत्वावर घेतली आहेत. चालकाविना एका इलेक्ट्रिक वाहनांचा महिन्याचा खर्च 43 हजार ते 53 हजार 600 रुपये इतका आहे. तर, चालकासह इलेक्ट्रिक वाहनाचे एका दिवसातील ठराविक किलोमीटर प्रवासाचे भाडे 1 हजार 949 रुपये आहे. त्या वाहनाचे एका महिन्याचे भाडे 1 लाखाच्या पुढे जाते. पर्यावरण संवर्धन, ग्लोबल वॉर्मिंग, इंधन बचतीच्या नावाखाली इलेक्ट्रिक वाहनांवर मोठा खर्च होत असून, महापालिका तिजोरीवर ताण वाढत आहे.

तत्कालिन आयुक्त शेखर सिंह यांनी पर्यावरणपूरक संदेश देण्यासाठी सुरू केलेला सायकल डे उपक्रम आता पूर्णपणे बंद आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सायकलने कार्यालयात यावे, वाहतुकीवरील ताण कमी व्हावा आणि इंधन बचतीचा संदेश जावा, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. मात्र, तो केवळ छायाचित्रापुरता मर्यादित राहिला. त्याप्रमाणे महापौर रवी लांडगे यांनी सायकल डेच्या उपक्रमाची घोषणा केली. मात्र, त्यालाही पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

महापालिकेकडून पर्यावरणपूरक संदेश देण्यासाठी इलेक्ट्रिक वाहने वापरली जात आहेत. अनेक अधिकारी इलेक्ट्रिक वाहने वापरत आहेत. मात्र, महापौर, उपमहापौर, स्थायी समितीचे अध्यक्ष तसेच, इतर पदाधिकाऱ्यांना इलेक्ट्रिक वाहन उपलब्ध करून न देता पेट्रोलची वाहने देण्यात आली आहेत. त्यामुळे महापालिकेकडून पर्यावरणपूरक वाहन धोरणाला हरताळ फासला जात असल्याची टीका पर्यावरणप्रेमींकडून केली जात आहे.

आखाती देशातील युद्धामुळे देशात इंधन टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे केंद्रासह राज्य शासनाने महापालिकेस इंधनावरील वाहनांचा वापर करून इलेक्ट्रिक वाहने वापरण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार महापालिकेकडून या पुढे केवळ इलेक्ट्रिक वाहने खरेदी किंवा भाड्याने घेण्याचा निर्णय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला आहे. त्यामुळे महापालिकेवर खर्चाचा भार आणखी वाढणार आहे. महापालिकेच्या मालकीचे वाहने एकूण 264 आहेत. ती वाहने 15 वर्षे झाल्यानंतर किंवा पूर्णपणे नादुरूस्त झाल्यानंतर भंगारात काढली जातात.

### खासगी वाहन वापरल्यास अधिकारी, पदाधिकाऱ्यांना दंड

महापालिकेचे पदाधिकारी व अधिकाऱ्यांना स्वत:चे खासगी वाहन वापरल्यास महापालिकेकडून प्रतिपूर्ती रक्कम दिली जाते. ती योजना 6 डिसेंबर 2017 पासून सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार महापौर व आयुक्तांच्या खासगी पेट्रोल वाहनासाठी दरमहा 66 हजार 935 रुपये आणि डिझेल वाहनासाठी 62 हजार 935 रुपये शुल्क दिले जाते. तर, उपमहापौर, पक्षनेता, विरोधी पक्षनेता, सर्व समितीचे सभापती आणि वर्ग एकच्या अधिकाऱ्यांना खासगी पेट्रोल वाहनासाठी दर महिन्यास 39 हजार 560 रुपये आणि डिझेल वाहनासाठी 36 हजार 560 रुपये शुल्क दिले जाते. वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांना खासगी पेट्रोल वाहनासाठी दरमहा 33 हजार 373 रुपये आणि डिझेल वाहनासाठी 30 हजार 873 रुपये शुल्क दिले जाते. त्यावर जानेवारी 2028 पासून ते आतापर्यंत, कोट्यवधी रुपयांचे शुल्क महापालिकेकडून अदा करण्यात आले आहेत.

---

# स्व. डॉ. अशोक तुळशीराम शिलवंत जयंतीनिमित्त मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**अशोक बँकेचे संस्थापक स्व. डॉ. अशोक तुळशीराम शिलवंत यांच्या ६४ व्या जयंतीनिमित्त श्री समर्थ जनरल हॉस्पिटल व सात्विक पॅथॉलॉजी लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**




> “समाजसेवा ही केवळ जबाबदारी नसून ती एक जीवनधर्म आहे. स्व. डॉ. अशोक तुळशीराम शिलवंत यांनी घालून दिलेला सेवाभावाचा वारसा पुढे नेणे हीच खरी त्यांना दिलेली आदरांजली आहे. अशा आरोग्य शिबिरांमधून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.”
>
> - आचार्य शिलरत्न शिलवंत.

या शिबिराचे उद्घाटन रावेत-किवळे परिसराचे लोकप्रिय नगरसेवक मा. निलेशभाऊ तरस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी श्री समर्थ जनरल हॉस्पिटलचे पटेल सर तसेच वानखेडे सर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. डॉ. अशोक तुळशीराम शिलवंत यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. तसेच समाजसेवेची त्यांची परंपरा पुढे नेण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या शिबिरामध्ये नागरिकांसाठी मोफत BMD, शुगर व ECG तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी व आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. मोठ्या संख्येने नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी आचार्य शिलरत्न शिलवंत यांनी सर्व मान्यवरांचे व सहभागी नागरिकांचे आभार मानले.

# आर्थिक निकष पाहून विक्रम काकडेंना उमेदवारी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद उमेदवारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) नाराजी उफाळून आली आहे. भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांनी पक्षाच्या उमेदवारी निवडीच्या प्रक्रियेवर तीव्र नाराजी व्यक्त करत विक्रम काकडे यांना आर्थिक निकषांच्या आधारे उमेदवारी देण्यात आल्याचा आरोप केला आहे.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना लांडे म्हणाले की, “पक्षातील अनेक वर्षे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून आर्थिकदृष्ट्या सक्षम उमेदवाराला संधी देण्यात आली. हा निर्णय कार्यकर्त्यांच्या भावना दुखावणारा आहे.” यावेळी त्यांनी पक्ष नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका करत, “आज अजितदादा असते तर त्यांनी पक्षासाठी आयुष्य घालवलेल्या कार्यकर्त्याचा विचार केला असता. त्यांच्या पश्चात आम्ही हतबल झालो आहोत,” अशी खंत व्यक्त केली.



# राष्ट्रवादीमध्ये पार्थ पवारच 'डिसिझन मेकर'

## उद्योजक मित्र विक्रम काकडे यांना विधान परिषद उमेदवारी ते पिंपरी-चिंचवडमध्ये आता खांदेपालट?

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये आता खासदार पार्थ पवार हेच 'डिसिझन मेकर' आहेत, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर झालेल्या विधान परिषद निवडणुकीत सुरूवातील मुंबईतील झिशान सिद्धकी यांना उमेदवारी देण्यात आली. त्यानंतर आता पुणे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उद्योजक विक्रम काकडे यांना उमेदवारी देण्यात आली. या दोन्ही नियुक्तींमध्ये पार्थ यांचा 'निर्णय अंतिम' ठरला आहे.**



२०१७ मध्ये पुणे महापालिकेतून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सत्ता उलथून लावण्यासाठी भाजपाचे माजी खासदार संजय काकडे यांनी रान पेटवले होते. त्याच संजय काकडे यांचा आज राष्ट्रवादीत प्रवेश घेण्यात आला. त्यांच्या मुलाला विक्रम काकडे यांना राष्ट्रवादीच्या कोट्यातून महायुतीची विधान परिषद उमेदवारी देण्यात आली.

वास्तविक, विक्रम काकडे आणि पार्थ यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामुळे पार्थ यांनी उमेदवारीबाबत त्यांना 'शब्द' दिला होता. तो शब्द पूर्ण करण्यात त्यांना यश मिळाले आहे. किंबहुना, पक्षात आता पार्थ पवार 'डिसिझन मेकर' आहेत, असा 'स्ट्राँग' मॅसेज देण्यात आला आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने खासदार पार्थ पवार यांनी महायुतीमध्ये एकूण १७ पैकी दोन जागा मिळवण्यात यश मिळवले. रायगड आणि पुणे या दोन जागा राष्ट्रवादीला मिळाल्या. यासाठी राष्ट्रवादीच्या सर्वेसर्वा सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांनी दिल्लीमध्ये भाजपा पक्षश्रेष्ठींकडे केलेली बोलणी यशस्वी केली. सोबत, ज्येष्ठ नेते व उद्योजक संजय काकडे यांच्या कुटुंबात उमेदवारी देण्याबाबत मुख्यमंत्री CM देवेंद्र फडणवीस यांची NOC मिळाली. त्यामुळे पार्थ पवार यांनी एका दगडात दोन पक्षी मारले आहेत. काकडेंना उमेदवारी देवून महायुतीतील संभाव्य दगाफटका दूर केला आणि पक्षाच्या उभारणीसाठी नव्या चेहऱ्याला सोबत घेतले. यासह आगामी लोकसभा, विधानसभा आणि महानगरपालिका निवडणुकीसाठी पुण्यात पक्षाला ताकद देणारा नेता हाताशी धरला आहे. तसेच, २०१७ मध्ये पुण्यात उद्योजक संजय काकडे यांनी राष्ट्रवादीला सुरूंग लावला होता. त्यांनाच पुन्हा हाताशी धरुन राष्ट्रवादीची विस्कटलेली घडी बसवण्यासाठी पार्थ यांनी आपला मित्र आणि संजय काकडे यांचा मुलगा विक्रम काकडे यांना मैदानात उतरवले आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदाची धुरा कुणाकडे मिळणार? याकडे हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### पार्थ पवार यांची रणनिती!

विधान परिषद निवडणुकीच्या माध्यमातून पार्थ पवार यांना स्वतःची विश्वासू आणि सक्षम टीम तयार करण्याची मोठी संधी आहे. पुढील तीन वर्षांनंतर लोकसभा आणि विधानसभा निवडणुका होणार असल्याने पक्ष संघटन अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. त्यासाठी अनुभवी नेत्यांसोबतच नव्या दमाचे, तरुण आणि विश्वासू चेहरे पुढे आणण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे ही निवडणूक पार्थ पवारांसाठी दीर्घकालीन राजकीय रणनीतीचा महत्त्वाचा भाग आहे. महायुतीमध्ये सहभागी असताना आगामी निवडणुका स्वबळावर लढवाव्या लागल्या, तर अल्पसंख्याक मतदारांना जोडणारा प्रभावी चेहरा म्हणून झिशान सिद्दकी यांना संधी देण्यात आली.

### शहरात लवकरच खांदेपालट..!

विधान परिषद निवडणुकीत पिंपरी-चिंचवडमधून माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर तथा शहराध्यक्ष योगेश बहल, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, नगरसेवक संदीप वाघेरे तीव्र इच्छुक होते. मात्र, पार्थ पवार यांनी नवा चेहरा समोर आणला. विशेष म्हणजे, लवकरच पिंपरी-चिंचवडमध्ये संघटनात्मक खांदेपालट करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यमान शहराध्यक्ष योगेश बहल यांना शहराध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची सूचना करण्यात आली आहे. शहराध्यक्षपदी आक्रमक आणि अभ्यासू नवीन चेहऱ्याला संधी देण्यात येणार आहे. त्यासाठी निर्णय लवकरच घेण्यात येणार आहे, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे.

# डॉ. अशोक शिलवंत यांच्या ६४ व्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**दिवंगत समाजसेवक, शिक्षणप्रेमी व अशोक सर्वांगीण विकास सोसायटीचे संस्थापक डॉ. अशोक (भाऊ) शिलवंत यांच्या ६४ व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने महानगरपालिका शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.**




इयत्ता दहावीच्या परीक्षेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शाळांमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या कु. प्रणव लोटन शिंदे आणि कु. आरती नागप्पा खैतनार यांचा शिष्यवृत्ती देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जागृत अपंग संघटना संचलित महात्मा फुले अपंग प्रशिक्षण केंद्र, माण येथील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत आयु. मानव कांबळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अध्यक्षीय समारोपात त्यांनी डॉ. अशोक (भाऊ) शिलवंत यांच्या समाजकार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत, "समाजाने देणारी वृत्ती जोपासली पाहिजे" असे मत व्यक्त केले. तसेच अपंगांनी अपंगांसाठी चालवलेली ही देशातील अनोखी संस्था असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत, कठोर परिश्रम, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर कोणतीही स्वप्ने साकार करता येतात, असे प्रतिपादन केले. डॉ. अशोक (भाऊ) शिलवंत यांनी शिक्षण, सामाजिक न्याय आणि सर्वसामान्यांच्या विकासासाठी आपले जीवन समर्पित केले होते. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित हा उपक्रम त्यांच्या विचारांना व कार्याला वाहिलेली खरी आदरांजली असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



"डॉ. अशोक (भाऊ) शिलवंत यांनी समाजसेवा, शिक्षण आणि सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच खरी त्यांना दिलेली आदरांजली आहे. आजच्या या उपक्रमातून आम्ही तोच सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी दृढ करण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यांनी जपलेली मानवतेची मूल्ये आणि लोककल्याणाची प्रेरणा आगामी पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे."

**- डॉ. सुलक्षणा शिलवंत.**

### अ‍ॅड. राजरत्न शिलवंत यांनी मानले आभार

कार्यक्रमास संस्थेच्या कार्याध्यक्ष आयु. नलिनी इनामदार, मुख्याध्यापक आयु. जगताप सर, सामाजिक कार्यकर्ते आयु. प्रताप गुरव, निवृत्त अधिकारी आयु. शरद जाधव, आयु. रवींद्र दुधेकर, आयु. वसंत साळवी, आयु. अनिल सूर्यवंशी तसेच श्रीमती कल्पना अशोक शिलवंत आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. सुलक्षणा शिलवंत-धर यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. दिलीप कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अ‍ॅड. राजरत्न शिलवंत यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन अशोक सर्वांगीण विकास सोसायटी, पुणे यांच्या वतीने करण्यात आले.